# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २५.०६.२०२६ गुरुवार**

**(कामगिरी)**

**गुन्हेशाखा, युनिट ०१ पोलीसांची कामगिरी :— अवैध मोहफुलाचे हातभट्टीवर धाड, दारूसाठा जप्त.**

दिनांक २५.०६.२०२६ चे १६.१० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट ०१ चे अधिकारी व अंमलदार हे गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत, मौजा कान्होलीबारा, डोंगरगाव, प्रशांत सोमनकर याचे शेतात, हिंगणा, नागपूर येथे पंचासमक्ष रेड कार्यवाही केली असता, आरोपी १) प्रशांत अशोक सोमनकर वय ३४ वर्ष २) अभय अशोक सोमनकर वय ३० वर्ष दोन्ही रा. कान्होलीबारा, डोंगरगाव, नागपूर हे संगनमताने मोहफुलाची गावठी दारु तयार करण्याची हातभ्टी चालवितांना मिळून आले. आरोपींचे ताब्यातून २८ लोंखडी ड्रम ज्यामध्ये अंदाजे ५६,००० लीटर मोहफुलाचा सडवा तसेच ३० लीटर मोहफुलाची गावठी दारू, दारु तयार करण्याचे साहित्य, ड्रम मिळून आला. आरोपींचे ताब्यातुन एकुण ५,७५,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मोहफुलाचा सडवा नष्ट करुन इतर साहित्याची विल्हेवाट लावण्यात आली. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे हिंगणा येथे कलम ६५(ई)(फ) महा. दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंदविला आहे. आरोपींना मुद्देमालासह हिंगणा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. प्रशांत ठवरे, सपोनि सचिन भोंडे, राजाभाऊ जाधव, पोहवा नितीन वासनिक, शरद चांभारे, रवी अहीर, हेमंत लोणारे, सुशांत सोळंके, कुणाल गेडाम व मंगेश बोरकुटे यांनी केली.





**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे तहसील :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या इसमास अटक.**

दिनांक २४.०६.२०२६ चे २०.५१ वा. चे सुमारास, तहसील पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, गार्डलाईन बोगद्याचे वरुन जाणारे पुलाचे खाली, नागपूर ज्युस सेंटरजवळ एक काळया व पांढरे रंगाचा फुलशर्ट घातलेला इसम शस्त्र घेऊन धुमधाम करीत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा ईसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले व निशस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अब्दुल वाहीद उर्फ गुड्डू वल्द मोहम्मद सईद अंसारी वय ३८ वर्षे रा. डोबीनगर, ख्वाजा का ठिय्या चौकजवळ, तहसील, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी धारदार चाकु किंमती ५००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे तहसील येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे गणेशपेठ :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २५.०६.२०२६ चे ०६.२५ वा. चे पुर्वी, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत, मोक्षधाम चौकाजवळील इमामवाडा बस आगार समोरील एसटी क्वॉर्टर्स चे वॉल कंपाऊंड लगत, रोडवर कोणीतरी अज्ञात वाहनाचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन पायी जाणाऱ्या एका ३५ ते ४० वर्ष वयाचे इसमांस धडक देवुन, घटनास्थळीच त्याचे जागीच मृत्युस कारणीभूत होऊन पळून गेला. मृतकाने आकाशी रंगाचा फुलबाहीचा टिशर्ट व हिरव्या रंगाची फुलपॅन्ट घातलेली आहे. मृतकाची अद्याप ओळख पटलेली नाही.

याप्रकरणी सरतर्फे फिर्यादी पोउपनि विक्रम सोनवणे ९०२२१६८९६३ यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे अज्ञात वाहन चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १३४(अ),१३४(अ),१७७,१८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे नंदनवन :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादीचा मुलगा नामे प्रणय दिलीप बडगे वय २४ वर्ष रा. प्लॉट क्र. ३४ ए, करुणा नगर, बुध्द विहारजवळ, कावरापेठ, शांतीनगर नागपूर हा त्याचे घराजवळ राहणारा मित्र नामे आर्य धर्मेश राठोड याचे सोबत त्याचे दुचाकी गाडी क्र. एमएच ४९ सीटी २७७३ ने कुही फाटा येथे नातेवाईकाचे वाढदिवसाचे कार्यक्रमाला रात्री गेला होता. दिनांक २५.०६.२०२६ चे ०७.१५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत, प्रजापती चौकाचे वर असलेल्या उडाणपुलावरुन घरी परत येत असता, उडाणपुलावर त्याचे मागुन येणाऱ्या कचरागाडी क्र. एमएच ३१ एफसी ४३०३ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मुलाचे गाडीला धडक देऊन पळून गेला. अपघातामध्ये फिर्यादीचे मुलाचे डोक्याला गंभीर दुखापत होऊन तो बेशुध्द झाला. त्यास उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी दिलीप तारांचद बडगे वय ५२ वर्ष रा. प्लॉट क्र. ३४ ए, करुणा नगर, बुध्द विहारजवळ, कावरापेठ, शांतीनगर नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि दळवी

९५४५९३३६५२ यांनी कचरागाडी चालकाविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १८४,१३४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे सिताबर्डी :—** आरीफ मेरी वेलांगणी रतनलाल लालजी वय ६८ वर्षे रा. इंदोरा चौकाजवळ किरायाने, जरीपटका, नागपूर ह्या दिनांक २३.०६.२०२६ चे २०.०० वा. पासुन पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीतील मोरभवन बस स्टॉप येथून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची— ४ फुट ८ इंच, केस— पांढरे व लांब, अंगात—हिरव्या रंगाची साडी व पिवळे ब्लाऊज घातलेले आहे. भाषा— हिंदी बोलतात. ओळखचिन्ह— उजवा हात वाकडा असून वाकून चालतात.



आरीफ मेरी

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**